नि. फौजदारी खटला क्र. १४/२०२२
सरकार – विरुध्द – जागेश्वर उर्फ शंकर

## <u>निशाणी क्र. १५ वर आदेश</u>
## (पारित दिनांक १०.०२.२०२६)

अर्ज व त्यावरील सहायक सरकारी अभियोक्ता यांचे खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>अर्ज</u> :**

२. प्रस्तुतचा अर्ज हा आरोपींतर्फे आजचे कामकाज तहकूब होऊन पुढील मुदत मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. आरोपी यांचे थोडक्यात कथन की, आरोपीचे वकील श्री. भोंबे हे मिडीएशनच्या ट्रेनिंगकरिता बाहेरगावी गेलेले असल्याने साक्षपुरावा होणे अशक्य झालेले आहे. सबब, साक्षपुरावा घेण्यासाठी पुढील मुदत मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

**<u>खुलासा</u> :**

३. प्रस्तुतच्या अर्जावर अभियोग पक्षातर्फे हरकत घेण्यात आली. फिर्यादी व साक्षीदार हजर आहेत. त्यामुळे त्यांचा ६००/– व ५००/– रुपये मजुरीचे नुकसान झाले. सबब अर्ज खारीज करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. प्रकरण हे सन २०२२ चे आहे. खटला हा भा.दं.वि.चे कलम ३२४, ४५२,५०४ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

प्रकरण दाखल झाल्यानंतर आरोपी यांना न्यायालयाने जामीनावर मुक्त केले. त्यानंतर प्रकरण हे पुराव्यावर होते. आज रोजी फिर्यादी व साक्षीदार विनोद हे हजर झाले. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला. अर्जात कारण हे विधिज्ञांचे वैयक्तीक देण्यात आलेले आहे. अर्ज नामंजुर केल्यास, आरोपी यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे, कारण त्यांची संधी डावलली जाईल. त्यामुळे जास्ती च्या साक्षी भात्त्यावर अर्ज मंजुर करावासा वाटतो. सबब एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**: आदेश :**

- अर्ज हा रुपये ६००/– (अक्षरी रुपये सहाशे मात्र) प्रत्येकी साक्षीभत्ता यावर मंजुर करण्यात येतो.
- सदरची साक्षी भत्ता हजर , फिर्यादी व साक्षीदार यांना अदा करण्यात यावा.

Sd/–

उमरेड .

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : १०.०२.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड.